IO

(56)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** हिमायतनगर **Year (वर्ष):** 2022
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0025 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/02/2022 05:19 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Date From (दिनांक पासून):** 14/02/2022
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date To ( दिनांक पर्यत):** 14/02/2022
**Time From (वेळेपासून):** 17:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 15/02/2022 **Time (वेळ):** 04:54 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 006 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/02/2022 04:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** हिमायतनगर ,ता हिमायतनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** किरण गंगाराम राठोड
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा वडगाव तांडा ,ता हिमायतनगर ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा वडगाव तांडा ,ता हिमायतनगर ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | वनदेव गोवर्धन कनाके | | | 1. पोलिस स्टेशन हिमायतनगर,ता हिमायतनगर ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | शेख महेबूब शेख जिलानी | | | 1. पोलीस स्टेशन हिमायतनगर , हिमायतनगर ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 3 | सय्यद मनान सय्यद अब्दूल | | | 1. रा बाजार चौक गल्ली हिमायतनगर ,ता हिमायतनगर ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक 15/02/2022फिर्यादमी किरण गंगाराम राठोड, वय 37 वर्ष व्यवसाय शेती, शिक्षण दहावी रा. वडगांव तांडा, ता. हिमायतनगर, जि. नांदेड. मो.नं.9503727898समक्ष पोलीस स्टेशन हिमायतनगर,जि.नांदेड येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे राहणार असुन शेती व्यवसाय करून माझे कुटूंबाचा उदनिर्वाह भागवितो.मी दिनांक 13/02/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड येथे समक्ष हजर राहुन पोलीस निरीक्षक श्री.अरविंद हिंगोले यांना मला होत असलेले लाच मागणी संबंधाने तक्रार लिहुन दिली होती ती अशी की, माझे व माझा मोठा भाऊ श्री.सुनिल गंगाराम राठोड यांच्यात पैशाच्या देण्या घेण्यावरून वाद झाला होता. त्यामुळे मोठा भाऊ श्री.सुनिल गंगाराम राठोड यांने माझे विरूध्द दिनांक 10/02/2022 रोजी पोलीस स्टेशन हिमायतनगर येथे तक्रार दिली आहे. हिमायतनगर पोलीस स्टेशनचे पोलीस/बिट जमादार श्री.कनाके साहेब यांनी दिनांक 12/02/2022 रोजी मला पोलीस स्टेशनला बोलावुन घेवुन म्हणाले की, माझे विरूध्द माझ्या मोठया भावाने पोलीस स्टेशन हिमायतनगर येथे दिलेल्या तक्रार वरून माझेवर कार्यवाही न करण्यासाठी तसेच प्राप्त तक्रारीवरून तहसिल कार्यालय हिमायतनगर येथे प्रतिबंधक कार्यावाही करण्यासाठी मला आधार कार्ड व सात बारा सोबत घेवुन येण्यास सांगुन त्यांचे स्वतःसाठी 2000/- रूपय लाचेची मागणी केली आहे. वगैरे स्वरूपाची तक्रार दिली होती.माझ्या दिनांक 13/02/2022 रोजीच्या तक्रारी वरून लाचमागणी पडताळणी कामी पो.नि.श्री.अरविंद हिंगोले, ला.प्र.वि.नांदेड हे दिनांक 14/02/2022 रोजी दोन शासकीय पंच व सापळा पथकासह त्यांच्या शासकीय वाहनाने हिमायतनगर पासुन तीन कि.मी.वर खडकी फाटा येथे आले. पो.नि.हिंगोले यांचे सुचने प्रमाणे मी सदर ठिकाणी माझे मोटार सायकलसह हजर होतो. सदर ठिकाणी सापळा पथकाचे वाहनत पो.नि.हिंगोले यांनी मला बसवुन घेवुन त्यांचे वाहनात हजर असलेले सापळा पथकातील दोन्ही पंचाची व सापळा पथकातील सदस्यांची मला ओळख करून देवुन माझी त्यांना ओळख करून दिली. त्यानंतर सदर ठिकाणी मला दोन्ही पंचास माझी तोंडी तक्रार कथन करण्यास सांगुन माझी हस्तलिखीत तक्रार पंचास वाचवयास देवुन त्यावर पंचाच्या स्वाक्ष-या घेतल्या.

त्यानंतर लाचमागणी पडताळणी अनुषंगाने मला, दोन्ही पंचास व सापळा पथकातील सदस्यानां योग्यत्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि श्री हिंगोले यांचे सुचनेवरुन पोना तालकोकुलवार यांनी माझ्याकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन देवुन माझे सोबत पंच क्र.1 श्री. नरहरी दहिफळे यांचेसह पोलीस स्टेशन हिमायतनगर येथे जावुन बीट जमादार कनाके यांची भेट घेवुन लाचमागणी पडताळणी कामी शासकीय वाहनापासुन 12:50 वाजता रवाना केले. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री.नरहरी दहिफळे असे दोघेजन माझे मोटार सायकलने पोलीस स्टेशन हिमायतनगर येथे गेलो. सदर ठिकाणी माझी व बिट जमादार श्री.कनाके यांची भेट त्यांचे लेखनिक हवालदार कक्षात झाली. तेव्हा ते मला म्हणाले की, माझयावर 107 ची कर्यवाही करणार असुन मला सातबारा व आधारकार्ड देण्यास सांगून पोलीस शेख यांचे सोबत थांबण्यास सांगीतले व ते बाहेर निघुन गेले. त्यानंतर तेथे श्री मन्नान हे आले. त्यावेळी शेख साहेबानी आम्हास बाहेर बसण्यास सांगून ते श्री मन्नान यांचेशी बोलत बसले. थोडया वेळानी श्री मन्नान हे माझया जवळ आले व त्यांनी आम्हास पोलीस स्टेशन जवळील हॉटेल मध्ये नेवून मला म्हणाले की, साहेबाला सांगून छोटी केस करायला सांगतो म्हणून माझ्या कडे त्यांचेसाठी 5000/- रुपयेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझेकडे तेवढे होणार नाहीत म्हणालो असता त्यांनी 4000/- रुपये मागीतले तेव्हा मी त्यांना माझेकडे 2000/- रुपये होतील असे बोललो असता ठिक आहे घेवून ये असे म्हणाले तेव्हा मी श्री मन्नान यांना म्हणालो की, मी 2000/- रुपये साहेबांच्या समोरच देईल तेव्हा ते ठिक आहे म्हणून मला पैसे घेवून येण्यास सागीतले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे दोघे मिळुन शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी परत गेलो. सदर ठिकाणी पो.नि.श्री.अरंविद हिंगोले यांनी पंच क्र.1 श्री. नरहरी दहिफळे यांचेकडे व माझेकडे विचारपुस करून लाचमागणी पडताळणी दरम्यान रेकॉर्डर झालेला आवाज ऐकले. त्यानंतर पत्रकार श्री. मन्नान यांनी माझे विरूध्द मोठा गुन्हा दाखल न करण्यासाठी व तहसिल कार्यालय येथून 107 ची कार्यवाही करून सोडण्यासाठी माझेकडे बिट जमादार श्री.कनाके व त्यांचे मदतनीस श्री शेख यांचेवतीने 2000/- हजार रूपये मागणी केल्याचे निष्पन झाले. त्यानंतर पो.नि.श्री.अरविंद हिंगोले यांनी लाचेचा सापळा लावण्याचा निणर्य घेतला. सापळा कार्यवाही अनुषंगाने पो.नि.श्री.अरविंद हिंगोले यांनी मला सुचना केली की, आपण जावुन बिट जमादार श्री.कनाके यांची भेट घेवुन त्यांना पत्रकार मन्नान यांनी सांगीतल्या प्रमाणे 2000/- रूपये घेवुन आलो आहे असे म्हणुन माझेवर काही कारवाई करू नका व तहसिल येथुन 107 ची कारवाई करून मला सोडुन दया म्हणुन विनंती करावी. तसेच त्यांनी पैशाची मागणी केल्यानंतरच त्यांना पैसे दयावे असे सांगीतले. त्यानंतर पंच क्र.1 श्री.नरहरी दहिफळे, पंच क्र.2 श्री.नामदेव सिंगरवाड यांना पोनी श्री हिंगोले यांनी योग्य सुचना दिल्या. तसेच सापळा पथकातील कोणी काय करावे या बाबत सर्व सापळा पथकास सुचना दिल्या. त्यानंतर शासकीय वाहनात सापळा पुर्व कार्यवाही अनुषंगाने मी हजर केलेल्या 2000/- रूपये लाचेच्या रक्कमेस ॲन्थ्रोसिन पावडर लावुन शासकीय वाहनात क्रत्रीम अंधार करुन ऑल्ट्राव्हाईलेट लंम्प व्दारे प्रात्याक्षीक करुन दाखविले तसेच ऑथ्रांसीन पावडरचे गुणधर्म सांगून त्यांचे महत्व सांगीतले, लोकसेवक यांनी लाचेची रक्कन स्विकारल्या नंतर करावयाचे इशा-याबाबत सांगीतले. त्यानंतर ऑथ्रांसीन पावडरयुक्त लाचेचे 2000/-रुपये रक्कम माझ्याकडे दिले. त्यानंतर पंच क्र.1 श्री.नरहरी दहिफळे, मी, व पोना गणेश तालकोकुलवार असे तीघे जन मिळुन माझे मोटार सायकलने व सापळा पथक शासकीय वाहनाने सदर ठिकणाहुन निघुन हिमायतनगर विश्रामगृह येथे आले. सदर ठिकाणी पोनि श्री हिंगोले यांचे सुचनेवरुन पोना तालकोकुलवार यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझेकडे दिले. त्यानंतर मी, पंच क्र.1 व पो.ना. श्री.तालकोकुलवार असे तिघे मिळुन माझे मोटार सायकलने पोलीस स्टेशन हिमायतनगर चे आवाराचे बाहेर बाजार पेठेत पोहचलो. त्यानंतर पोनि हिंगोले व सापळा पथक पोलीस स्टेशनचे आवारात आल्याची आम्ही खात्री केली. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री.नरहरी दहिफळे असे दोघे मिळुन पोलीस स्टेशनच्या गेटच्या बाहेर मोटार सायकल उभी करून पोलीस स्टेषनचे आत जावुन बिट जमादार श्री.कनाके यांचे लेखनिक हवालदार यांचे कक्षात जावुन बिट जमादार श्री.कनाके यांची भेट घेतली. तेव्हा ते मला म्हणाले की, तुम्ही भावा सोबत भांडन करून नका, समोरा समोर काय हाय ते तुमच मिटवुन टाका, त्यांचेकडे तुमच सोन असेल तर ते परत देण्यास सांगतो, तुझे काम उदया करतो, त्यासाठी ते काम करुन उद्या घेवुन ये असे म्हणाले, तसेच माझे लहान भावु नामे बालाजी राठोडचा मोबाईल फोन त्यांनी घेवून ठेवला होता तो मोबाईल परत देण्यासाठी हजार रूपय दे असे म्हणाले. तेव्हा जवळच उभे असलेले बिट जमादार कनाके यांचे रायटर श्री.शेख महेबुब यांनी देखील मला पैसे देवुन टाका असे म्हणाले तेव्हा मी माझे जवळील ॲन्थ्रोसिन पावडर लावले 2000/- रूपये खिशातुन काढले तेव्हा श्री.कनाके साहेब यांनी माझे हातातील 2000/- रूपये हिसाकावुन घेतले व त्यापैकी 500/- रूपयाची नोट त्यांचे रायटर शेख महेबुब यांचेकडे दिले. माझ्याकडून श्री कनाके साहेबानी 2000/- रुपये घेवून त्यातील 500/- रूपयाची नोट शेख महेबुब यांना दिली व बाकीचे 1500/- रूपये श्री कानाके साहेबानी स्वतःसाठी घेवुन सदरील रक्कम त्यांचे टेबलचे ड्रावहर मध्ये ठेवली. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री.नरहरी दहिफळे असे दोघे मिळुन पोलीस स्टेशनच्या मुख्य गेट जवळ 17:30 वाजताचे दरम्यान येवुन माझे गळ्यातील दस्ती हातात धरून लाच स्विकृती बाबतचा पुर्वनियोजीत ईशारा केला. तेव्हा पो.नि.श्री.अरविंद हिंगोले यांचेसह सर्व सापळा पथक सर्तक होवुन पोलीस स्टेशन गेट जवळुन येवून आम्हाला सोबत घेवुन पोलीस स्टेशनचे आत प्रवेष केला. त्यानंतर पंच क्र.1 यांचेकडे विचारपुस करून बिट जमादार श्री.कनाके व त्यांचे रायटर श्री.षेख महेबुब यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोलीस स्टेशन येथील स्टाफच्या मार्फतीने पत्रकार श्री.मन्नान यांना पोलीस स्टेशनला बोलावुन घेवुन त्यांना देखील ताब्यात घेतले आहे.तसेच सापळा कार्यवाही वेळी बिट जमादार कनाके यांनी माझी बोली भाषा गोरमाटी मध्ये केलेले संभाषण मी पो.नि.अरविंद हिंगोले यांना मराठी मध्ये समजावुन सांगुन त्यात बिट जमादार यांनी काय बोलले आहेत ते सविस्तर सांगीतले आहे.तरी दिनांक 14/02/2022 रोजी 17:30 वाजताचे दरम्यान पोलीस स्टेशन हिमायतनगर, जि.नांदेड येथील लेखनिक हावलदार यांचे कक्षात माझे भावाने माझे विरूध्द केलेल्या तक्रारी वरून मोठा गुन्हा दाखल न करता फक्त 107 ची कार्यवाही करण्यासाठी पोलीस स्टेशन हिमायतनगर मध्ये माझेकडे पत्रकार श्री मनान यांचे मार्फत पैशाची मागणी करून माझा लहान भावू बालाजी राठोडचा मोबाईल परत देण्याकरीता म्हणुन पत्रकार श्री.मनान यांनी म्हणाल्या प्रमाणे माझेकडुन 2000/- रूपये बिट जमादार श्री.कनाके यांनी स्वतः स्विकारून त्यातील 500/- रूपये त्यांचे रायटर श्री शेख महेबुब यांना दिले व बाकीचे पैसे बिट जमादार श्री कनाके यांनी स्वतः घेतले आहेत. त्या दोघांनी माझे कडुन स्विकारलेली लाचेची रक्कम माझे व पंच क्र.1 नरहरी दहिफळे यांचे समक्ष दोघात वाटुन घेतली. तसेच रायटर शेख महेबुब यांनी माझे व बिट जमादार कनाके यांचे बोलने चालु असतांना पैसे देवुन टाक असे म्हणुन कनाके यांना पैसे देण्यासाठी मला प्रोत्साहन दिले. तसेच पत्रकार श्री.मनान यांनी बिट जमादार कनाके व पोलीस शेख महेबूब यांचे वतीने माझेकडे पैशाची मागणी करून 2000/- रूपये लाचेची रक्कम देण्यासाठी मला प्रोत्साहन दिले म्हणुन माझी 1) श्री.वनदेव गोवर्धन कनाके पोलीस जमादार, पोलीस स्टेषन हिमायतनगर, जि.नांदेड 2) श्री.शेख महेबुब षेख जिलानी, पोलीस शिपाई, पोलीस स्टेशन हिमायतनगर,जि.नांदेड 3) श्री.सयद मनान सयद अब्दुल, व्यवसाय मुद्रांक विक्रेता व पत्रकार, रा.बाजार चैक गल्ली, हिमायतनगर, ता.हिमायतनगर, जि.नांदेड यांचे विरूध्द कायदेषीर फिर्याद आहे. ही फिर्याद दिली.

13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): bhagwan bhimrao kamble(I (Inspector)) / POBN72506 or (किंवा)

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):
Rank (पद):
No.(क्र.): to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन हिमायतनगर

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही)

Name (नाव): bhagwan bhimrao kamble
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): POBN72506